# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७,मुंबई-४००००१.**

---

**क्रमांक** २/एनजीसी//१०९९/१४८१
दिनांक

3 MAY 2000

प्रति,
अध्यक्ष,
अंजुमन कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,
ॲन्ड टेक्नॉलॉजी,
सदर नागपूर-४४० ००१.

विषय- शैक्षणिक वर्ष १९९९-२००० पासून विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी मंजूरी देण्याबाबत.

महोदय,

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांचे पत्र क्रमांक एफ ७४०- ८९-३३३ (इ)/इटी/९९, दिनांक २ .७.१९९९ तसेच शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पीटीसी-२०९९/५३४५८(२६९/९९)तांशि-१, दिनांक १.७.१९९९ अन्वये आपल्या संस्थेस शैक्षणिक वर्ष १९९९-२००० पासून विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या पदवी अभ्यासक्रमासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह मंजूरी देण्यांत आली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| २. | इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलि.इंजि. | ६० |
| ३. | इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड पॉवर | ६० |
| | एकूण | १८० |

सदर मान्यता ही खालील अटींच्या अधिन राहून देण्यांत येत आहे.

१. शासन निर्णय,शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम-३३८२/११९८३६/(१९०)/तांशि-१, दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस बंधनकारक असतील.

२. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून विहित करण्यांत येणाऱ्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत आपल्या संस्थेने करारनामा केला आहे त्याचे पालन करावे लागेल.

जाधव/इंजि.ऑर्डर/

३. प्रस्तावित अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणास संस्थेने संबंधित विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विद्यापीठाकडून यथोचित माहिती घेण्यांत यावी.

४. विना अनुदान तत्वावर चालणाऱ्या अभियांत्रिकी संस्थेच्या बाबतीत [redacted] अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,राज्यशासन तंत्रशिक्षण संचालनालय व संबंधित विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी येणाऱ्या नियमांच्या,प्रवेश नियमांच्या आरक्षणाची शिक्षणशुल्क व इतर शुल्क यासंबंधीच्या निर्णयाचे पालन करणे संस्थेला बंधनकारक असेल.

५. संस्थेने अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी नियतठेव म्हणून रु. १०.०० लाख संचालक,तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य,मुंबई व व संस्थेचे अध्यक्ष यांच्या संयुक्त खात्यात दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.मातागर्वेच सदर नागपूर येथे पावती क्रमांक ५१०१४ दिनांक २६.११.९९ अन्वये जमा केलेले आहेत. यापुढे पुढील 3 शैक्षणिक ४ वर्षात प्रत्येकी रु.५.०० लाख प्रमाणे संयुक्त खात्यात जमा करणे आवश्यक आहे.

६. आपण आपल्या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमानुसार वेतन व इतर भत्ते तसेच इतर सुविधा देण्यांत याव्यात.

७. संस्थेतील प्रयोगशाळा,कर्मशाळा व आरेखन कक्ष हे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार व प्रमाणकानुसार आवश्यक ती यंत्रसामुग्री , उपकरणे,फर्निचर इत्यादी ची खरेदी करुन सुसज्ज करणे आवश्यक राहील.

८. तसेच संस्थेतील ग्रंथालयात आवश्यक ती पुस्तके,नियतकालिके इ.अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

९. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासनाने सन १९९३-९४ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार संबंधित संस्थांचे प्रवेश संचालक,तंत्रशिक्षण यांच्यामार्फत म्हणजेच या कार्यालयामार्फत करण्यांत येतील याची नोंद घ्यावी.

वरील सर्व अटी व शर्ती जर संस्थेने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानके व प्रमाणकानुसार आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करु न शकल्यास किंवा शासनाने,वा संचालनालयाने , संबंधित विद्यापीठाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणांस बंधनकारक आहेत.

( न. बा. पासलेकर )
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत

१.मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई-३२ यांना संदर्भाधीन शासन निर्णयासंदर्भात सादर.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

३. कुलगुरु नागपूर विद्यापीठ नागपूर.

आवकजावक.ऑफिस

ANJUMAN COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY
SADAR, NAGPUR.

| | |
|---|---|
| (1) | PRINCIPAL |
| (2) | ACCOUNTANT |
| (3) | CLERK |
| (4) | Sr. & Dt. 19 May 2000<br>No. 279 |

Please file the copy & send one copy to ...